# डाळिंब पिकासाठी सल्ला (जून-जुलै)

डॉ ज्योत्सना शर्मा , डॉ आशिस माइति , डॉ मल्लिकार्जुन , श्री दिनकर चौधरी , श्री युवराज शिंदे

## मृगबहार

**अ) अन्नद्रव्य व्यवस्थापन**

**फळबागेची अवस्था - ताण तोडणे**

१) २५-३० किलो कूजलेले शेणखत किंवा १५-२० किलो शेणखत + २ किलो गांडूळ खत + २ किलो निंबोळी पेंड/झाड द्यावे.

किंवा ७.५किलो चांगले कूजलेले कोंबड़ी खत + 2 किलो निंबोळी पेंड/झाड याप्रमाणे द्यावे.

२) प्रत्येक झाडाला २.५ ते २.8 किलो जिप्सम आणि ८०० ग्रॅम मॅग्नेशियम सल्फेट मूळाजवळच्या (राईझोस्फियर) मातीत मिसळा.

३) जैव-फॉर्म्युलेशन जसे अजोस्पिरिलम स्पेसीज़, ॲस्परजिलस नायजर, ट्रायकोडर्मा विरिडी आणि पेनिसिलियम पीनोफायलम हे चांगले कूजलेले शेणखतासोबत मिसाळावे व ६०% ओलावा ठेवून सावलीत १५ दिवस नियमितपने उलथापालथ करत राहावे व १०-२० ग्रॅम/झाड द्यावे .

४) अर्बुस्कुलर मायकोरायझा बुरशी, एएमएफ (राइझोफॅगस इररेगुलरिस) प्रति रोप १०-१५ ग्रॅम/झाड द्यावे

५) खत दिल्यानंतर लगेच हलके पाणी द्यावे.

**ब) कीड व्यवस्थापन**

**अंकुरण्याची अवस्था :**

१. पहिली फवारणी आझादिरॅक्टिन / कडुनिंब तेल १% (१०००० पीपीएम) ३.० मिली + ०.२५ मिली स्प्रेडर स्टिकर/लिटर किंवा करंज बियांचे तेल ३.० मिली + ०.२५ मिली स्प्रेडर् स्टिकर/लिटर.

२. **किंवा** ०.५ मिली स्प्रेडर स्टीकर सोबत वरीलप्रमाणे ३+३ मिली/लिटर ची सम्मिश्र फवारनी करावी.

३. पहिल्या फवारनीच्या ७-१० दिवसानतर सिॲनट्रानॅलीप्रोल (बेनेव्हिया) ०.७५ मिली + ०.२५ मिली स्प्रेडर स्टिकर/लि किंवा थाईमिथॉक्सम २५% डब्ल्यूजी ०.५ ग्रॅम + ०.25 मिली स्प्रेडर स्टीकर/ लि.

४. **फुल कळीची/फुलांची अवस्था**: स्पिनेटोरम १२% एससी १.० मिली + स्प्रेडर स्टीकर ०.२५ मिली/लि प्रमाणे फवारावे.**किंवा** स्पिनोसॅड ४५% एससी ०.५मिली + स्प्रेडर स्टिकर ०.२५मिली/लि प्रमाणे फवारणी करावी.

५. फुलधारनेसाठी प्लानोफीक्स @ २२.५ मिली/लीटरची फवारणी करावी.

६. मायक्रोन्यूट्रिएंट मिश्रणाची १-१.५ किलो/हेक्टरची फवारणी करावी.

७.**फळधारनेस सुरुवात/फळधारणा** : क्लोरंट्रानिलीप्रोल (18.५% ईसी) @ ०.७५ मिली + ०.२५ मिली स्प्रेडर स्टिकर/लि प्रमाणे फवारावे.

**फुलधारणा अवस्था :**

८.जर सूत्रकृमींचा प्रादुर्भाव झाला असेल तर फ्ल्युन्सल्फोन २% जीआर हे ४० ग्रा/ झाड याप्रमाणे दोन वर्षा पुढील झाड़ाना ड्रिपर्सच्या संखेप्रमाणे द्यावे.देताना प्रत्येक ड्रिपरच्या खाली मातीच्या सम प्रमाणात किंवा ४० ग्रॅम ४ ते ५ लिटर पाण्यात विरघळून झाड़ाभोवती गोलाकार पद्धतीने ५-१० सेमी खोल ओतवे.

**आंतरमशागतीची कामे**

१) वाळलेली, मोडलेली सर्व अवशेष काढून टाका / तण काढून त्यांची योग्यप्रकारे विल्हेवाट लावा.
२) पहिल्या पावसानंतर बागेतील मातीवर २.% ब्लीचिंग पावडरची फवारणी करावी..
३) फळ लिंबाचा आकाराची / १०० ग्रॅम होईपर्यंत वेळोवेळी नवीन स्प्राउट्स काढा.
४) वॉटरशूट्स काढ़ल्यावर शिफारस केलेल्या रसायनांसह स्टेम पेस्टिंग करा.
५) झाडाखालील तण काढून बाग स्वछ ठेवा .

## हस्त बहार

**अ) अन्नद्रव्य व्यवस्थापन**

**फळबागेची अवस्था - विश्रांतीचा कालावधी**

१.मागील फळ तोड़नी नंतर पिकाची छाटणी केली नसेल तर झाडाची हलकी छाटणी करा.

२. प्रत्येक रोपासाठी २० ते २५ किलो कूजलेले शेणखत किंवा १३-१५ किलो कूजलेले शेणखत + २ किलो गांडूळ खत + २ किलो निंबोळी पेंड द्या.

३.किंवा ७.५ किलो चांगले कूजलेले कोंबड़ी खत + २ किलो निंबोळी पेंड/झाड द्या.

४. २०५ ग्रॅम नत्रसाठी (446 ग्रॅम नीम कोटेड युरिया/झाड ) ५० ग्रॅम स्फुरदसाठी (३१५ ग्रॅम सिंगल सुपर फॉस्फेट/झाड) आणि १५२ ग्रॅम पालाशसाठी (२५४ ग्रॅम म्युरेट ऑफ पोटाश किंवा ३०४ ग्रॅम सल्फेट/झाड) हलके सिंचनाद्वारे दयावे.

**ब) कीड व्यवस्थापन**

१. स्टेम बोरर, शॉट होल बोरर, वाळवी आणि पाने खाणारे सुरवंट इ. साठी नियमित निरीक्षण करावे.

२. खाली दिलेल्या संपर्काच्या सल्ल्यानुसार दर १५-२० दिवसांनी गरजेनुसार फवारणी घ्या.

## आंबिया बहार

**अ) अन्नद्रव्य व्यवस्थापन**

**फळबागेची अवस्था - फळ वाढीचा कालावधी**

१. ड्रीपद्वारे एन: पी: के ००:५२:३४ (मोनो-पोटॅशियम फॉस्फेट), युरिया आणि ०:०:५० हे अनुक्रमे ८.५०, २२.५० आणि १६.३० किलो/हेक्टर/वेळ असे ५-७ दिवसाच्या अंतराने ५ वेळा द्यावे.

२.सूक्ष्मअन्नद्रव्य युक्त मिश्रनाची १-१.५ किलो/हेक्टर याप्रमाने फवारणी करावी.

३.जिबरेलिक एसिड ५० पीपीएमच्या १५ दिवसांच्या अंतराने दोन फवरन्या कराव्यात.

४.००:५२:३४ (मोनो-पोटॅशियम फॉस्फेट) च्या १० ग्रॅम/लिटर याप्रमाने तीन फवरन्या कराव्यात

५.मॅंगनीज सल्फेटच्या १० दिवसांच्या अंतराने ६ ग्रॅम/लिटर याप्रमाने दोन फवरन्या कराव्यात

**ब) कीड व्यवस्थापन** -

१.फळ पोखरणरि आळीची अंडी आवस्था दिसून आल्यास: आझादिरॅक्टिन/कडुलिंबाचे तेल १% (१०००० पीपीएम) हे ३मिली + स्प्रेडर स्टिकर ०.२५ मिली/लीटर किंवा करंज बियांचे तेल हे ३मिली + स्प्रेडर स्टिकर ०.२५ मिली/लीटर ची फवारणी करावी.

२. किंवा ०.५ मिली स्प्रेडर स्टीकर सोबत वरीलप्रमाणे ३+३ मिली/लिटर ची सम्मिश्र फवारनी करावी.

३. अळी दिसल्यास/फळावर छिद्रे दिसल्यास: सर्व प्रदुर्भावित फळे काढून , खड्ड्यात पुरुन टाका आणि सिन्ट्रानॅलिप्रोल/क्लोरानट्रानिलीप्रोला ०.७५ मिली/एल + स्प्रेडर स्टिकर ०.25 मिली/लिटर फवारणी करा.

**सूचना**

१) वरील एन. पी. के. च्या शिफारसी पाने परिक्षण अहवालाच्या इष्टतम श्रेणीप्रमाणे आहेत. जर एखादा घटक इष्टतम श्रेणीपेक्षा कमी असल्यास, वरील शिफारस २५% ने वाढविण्याचा सल्ला दिला जातो.





**बहार संपल्यावर खरड छाटनी** **बहार धरताना हल्की छाटनी**





**बाहेरिल बाजूस फुलधारणा अयोग्य** **आतिल बाजूस फुलधारणा योग्य**

| सर्व बहारातील रोगांच्या व्यवस्थापनासाठी |
|---|
| तेलकट डागासाठी फल पिकाच्या कलावधित फवारनी<br>(७ ते १० दिवसांच्या अतराने)<br>बोर्डो मिश्रण(फक्त ०.५%,छाटणीनंतर १% वगळता)<br>त्यानंतर<br>स्ट्रेप्टोसायक्लिन (५ ग्रॅम/१०ली)<br>**किंवा**<br>२-ब्रोमो, २-नायट्रो प्रोपेन -१, ३-डायओल (ब्रोनोपोल) @ ५ ग्रॅम / १० ली<br>+ |

| |
|---|
| कॉपर ऑक्सीक्लोराइड किंवा कॉपर हायड्रोक्साईड (२०-२५ ग्रॅम / १० ली)<br>+<br>स्प्रेडर स्टिकर (५मिलि/१०लि )<br>फळबागेत असलेल्या बुरशीजन्य रोगाच्या प्रादुर्भावानुसार कॉपर फॉर्मूलेशनवर आधारित बुरशिनाशकात, योग्य बदल केले जाऊ शकतात.<br>सॅलिसीलिक एसिड च्या ०.३ ग्रॅम /ली याप्रमाणे ४ फवारण्या करा.<br>सूक्ष्म अन्नद्रव्यच्या 4 फवारण्या करा. |
| **तेलकट डागासाठी तातडीच्या फवारण्या**<br>हिरव्या लिंबाच्या अवस्थेतील फळांवर दिसणारे तेलकट डागाच्या प्रादुर्भावानंतर लवकरच ४ दिवसांच्या अंतराने १-२ फवारण्या घ्या.<br>१. स्ट्रेप्टोसाइक्लिन (५ ग्रॅम / १० लि) + ब्रोनोपोल (५ ग्रॅम / १० लि) + **कोसाइड (२० ग्रॅम / १० लि)** + स्प्रेडर स्टिकर (५ मिलि / १० लि).<br>२. स्ट्रेप्टोसाइक्लिन (५ग्रॅम / १० लि) + ब्रोनोपोल (५ ग्रॅम / १० लि) + **कार्बेंडाझिम (१० ग्रॅम / १० लि)** + स्प्रेडर स्टिकर (५ मिली / १० लि) |
| **खबरदारीचे उपाय**<br>• शिफारस केलेल्या मात्रेनुसार फक्त आवश्यक फवारण्या घ्या<br>• एकूण फवारण्यांची संख्या कमी करा.<br>• पाऊस झाल्यानंतर अतिरिक्त फवारणी घ्या.<br>• बोर्डो मिश्रणाशिवाय च्या फवारणीत नॉन आयनिक स्प्रेडर स्टीकर वापरा.<br>• प्रत्येक फवारणी करण्यापूर्वी सर्व जीवाणूजन्य डाग / रॉट प्रादुर्भावित फळे काढून जाळा.<br>• बोर्डो मिश्रण ताजे तयार करा आणि त्याच दिवशी वापरा<br>• फवारण्या संध्याकाळी घ्या |
| **विश्रांती कालावधीत**<br>(१०-१५ दिवसांचे अंतर)<br>1% बोर्डो मिश्रण घ्या |

| |
|---|
| किंवा<br>कॉपर ऑक्सीक्लोराईड किंवा कॉपर हायड्रोक्साईड किंवा योग्य बुरशीनाशक + (२०-२५ ग्रॅम / १० लि) + स्प्रेडर स्टिकर (५ मिली / 10 लि) |
| डाळिंब बुरशीजन्य स्कॅब, स्पॉट्स आणि रॉट्ससाठी काही उपयोगी बुरशीनाशके<br>१: मंडिप्रोपॅमिड २३.४% एससी @१ मिली / लि<br>२: प्रोपिकोनाझोल २५% ईसी @१ मिली / लि + झोक्सीस्ट्रॉबिन @१ मिली / लि<br>३: अझोक्सिस्ट्रोबिन २०% + डिफिनेकोनाझोल १२.५% एससी @२ मिली / लि<br>४: क्लोरोथॅलोनिल ५०% + मेटालाझक्झिल एम ३.७५% @२ मिली / लि<br>५: बोर्डो मिश्रण ०.५%<br>6: ट्रायसाइक्झोल 18% + मॅन्कोझेब 62% डब्ल्यूपी @2-2.5 ग्रॅम / लि<br>7: क्लोरोथॅलोनिल 75% डब्ल्यूपी @2 ग्रॅम / लि<br>8: प्रोपिकोनाझोल @1 मिली / लि<br><br># **सूचना**<br>१.वरीलपैकी कोणत्याही २ बुर्शिनाशकाच्या फुलधारना आणि फळधारनेच्या कालावधित 15 दिवसांच्या अंतराने फवारन्या केल्यास चांगला फायदा होतो.तसेच पुढील काळात अनेक फवारण्या टाळता येतात.<br>२.बोर्डो मिश्रण वगळता नेहमीच फवारनित स्प्रेडर स्टीकर वापरा.<br>३.अवशकतेनुसारच फवारण्या नंतर केल्या पाहिजेत.<br>४.हंगामात कॉपरजन्य बुरशीनाशकांशिवाय कोणत्याही कीडकनाशकाचा वापर 2 पेक्षा जास्त वेळा करु नये. |
| **बुरशीजन्य मर रोगाचे व्यवस्थापन**<br># **सूचना**<br>फळ तोड़णीनंतर तानावर असताना किंवा पिकाच्या सुरुवातीच्या टप्प्यात ड्रेचिंगला प्राधान्य द्या.<br>**खालीलपैकी फक्त एक पद्धत वापरा**<br>➢ १.ली ड्रेचिंग प्रोपिकोनाझोल २५%२मिली/लि+ क्लोरपायरीफॉस २ मिली/ लि (१० लि |

सोल्यूशन) ने करा. पहिल्या ड्रेचिंगच्या ३० दिवसानंतर ॲस्परजिलस नायजर ए एन 27 बुरशी ५ ग्रॅम / झाड आणि २ किलो शेंनखत.त्यानंतर ३० दिवसांनी व्हीएएम बुरशी (वेसिक्युलर आर्बस्क्युलर मायकोरायझा - राइझोफॅगस इररेगुलरिस) @ २५g ग्रॅम / झाड आणि २ किलो शेंनखत.

**किंवा**


- टिल्ट (प्रोपिकोनाझोल २५%) २ मिली/ लि + क्लोरपायरीफॉस २ मिली (२० दिवसांच्या अंतराने ३ ड्रेचिंग करा.)

**किंवा**

- १ली ड्रेचिंग फोसेटिल ए एल ८०% डब्ल्यूपी ६ ग्रॅम / झाड (१० लि सोल्यूशन)] [२ री ड्रेचिंग टेब्यूकोनाझोल २५.९% डब्ल्यू / डब्ल्यू ई सी ३ मिली / झाड (१० लि सोल्यूशन)] [३ री ड्रेचिंग फोसेटिल ए एल ८०% ६ग्रॅम / झाड ( १० लि सोल्यूशन)] [४ थी ड्रेचिंग टेब्यूकोनाझोल २५.९% ३ मिली / झाड (१० लि सोल्यूशन)] (२० दिवसांच्या अंतराने)



मर रोग प्रादुर्भावित मृदा निर्जन्तुक प्रक्रिया समजण्यासाठी सचित्र लेआउट

| | | | |
|---|---|---|---|
|  | मर रोगाने पूर्णपने वाळलेले झाड उपटून वेवस्थित नष्ट केले आणि लागण(२५%) झालेल्या झाड़ाच्या मातीला फोर्मअल्डेहाइड ने निर्जन्तुक केले. |  | मर रोगाची लागण झालेली झाडे तसेच सभोवतालच्या निरोगी झाड़ाची माती बुरशीनाशकाने निर्जन्तुक केली. |

मर रोग प्रादुर्भावित मृदा निर्जन्तुकीकरण प्रक्रिया



**बुरशीनाशकाने ड्रेचिंग करण्याची योग्य पद्धत**

## बायोफोरमूलेशन ॲस्परजिलस नायजर ए एन 27 बुरशी चे फायदे

१. ॲस्परजिलस नायजरचा वापर करून जैविक किडनाशक आणि जैविक खताचे पेटंट मिळवलेले जगातील एकमेव बायोफोरमूलेशन

२.सूत्रकृमिसह मर रोगाच्या सर्व प्रकारच्या रोगजनकांवर नियंत्रण ठेवते.

३.सर्व प्रकारच्या हवामानात,माती व पानी परिस्थितीमध्ये कार्य करते.

४.फायदेशीर वनस्पती संप्रेरके सोडते म्हणून झाडाची वाढ,फुलधारना फ़ल उत्पादनाला प्रोत्साहन मिळते.

५.वनस्पतींमध्ये रोग व इतर तनाव प्रतिकार शक्ती वाढवते.

६.ॲस्परजिलस नायजर ए एन 27 बुरशी आणि व्हीएएम बुरशी (वेसिक्युलर आर्बस्क्युलर मायकोरायझा-राइझोफॅगस इररेगुलरिस) (पूर्वी ग्लोमस इंट्रारेडिस म्हणून ओळखले जाणारे) मध्ये एकरूपता आहे.

७. व्हीएएम फंगस डाळिंबाच्या मुळांमध्ये स्थापित होते आणि पाण्याच्या ताण परिस्थितीत मदत करते.

८. दोन्ही बुरशी फॉस्फेट विरघळणारया आहेत.

**संक्षिप्त माहितीसाठी काही महत्वाच्या लिंक :-** वरील बहारातील रोग व किड निदानाच्या आधिक माहितीसाठी खलील लिंकचा उपयोग करावा.

- केमिकलची ॲडॉक यादी. http://nrcpomegranate.icar.gov.in/files/Advisory/30.pdf
- आय डी आय पी एम शेड्यूल. http://nrcpomegranate.icar.gov.in/files/Advisory/12.pdf
- मर रोग व्यवस्थापन http://nrcpomegranate.icar.gov.in/files/Advisory/34.pdf